Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2406IIV12P015

e-ISSN No. 2394-8426
June-2024
Issue–II, Volume–XII

# नांदेड शहरातील बालकामगाराच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन

मार्गदर्शक
**डॉ.डी.एस. धारवाडकर**
सहायक प्रध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख
तोष्णीवाल आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज सेनगाव
जिल्हा हिंगोली, मो. ९१३०००७४४४

**दिगंबर फकीरराव हरदडकर**
पीएच.डी. संशोधक
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मो. नं. ९७६५२१२८५९

***Received on:*** *16 May ,2024* ***Revised on:*** *20 June ,2024* ***Published on:*** *30 June ,2024*

**सारांश :**

कोणत्याही देशाचे भविष्य हे त्या देशातील बालकांवर अवलंबून असते. बालक हे देशाचे भविष्य घडविणारे असतात. पण ज्या वयात त्या बालकांना आपले बालपण आनंदाने जगायचे असते त्या वयात अनेक बालक हे शिक्षण घेणे किंवा खेळण्यासोबत खेळण्या ऐवजी त्यांना नाईलाजास्त काम करावे लागत असते. या मध्ये असे अनेक बालक आहेत की जे धोकादायक उद्योगांमध्ये काम करत असतात आणि त्यामुळे त्यांना अनेक रोगाची लागण होत असते आणि त्यातुनच काही बालकांचा मृत्यू सुध्दा होत असतो. मागिल पाच दशकाच्या नियीमत योजना, कल्याणकारी कार्यक्रम, विधी निर्माण आणि प्रशासकीय कार्य करत असून सूध्दा भारतातील अनेक बालक हे बालमजुरी करतांना आपणास दिसून येतात.

प्रस्तुत शोध पेपर मध्ये नांदेड शहरामध्ये विविध ठिकाणी काम करणाऱ्या बालकाच्या समस्यांचे अध्ययन करण्यात आले आहे. नांदेड शहर हे मराठवाड विभागमधील एक प्रगत शहर असून त्यांचा विकासाचा दर हा अन्य शहरांच्या तुलनेत अधिक आहे. या शहरामध्ये अनेक मोठ मोठे उद्योग, हॉटेल्स व अन्य ठिकाणी अनेक बालमजुर हे काम करताना आपणास दिसून येतात.

**मुख्य शब्द :** बालकामगार, शहरीकरण, उद्योग व्यवसाय, मनोचिकित्सा, अत्याचार.

**प्रस्तावना :**

भारतामध्ये एकूण लोकसंख्येच्या ३७.७ टक्के बालक हे १५ वर्षापेक्षा कमी वयाचे आहेत. गरीब परीवारातील अनेक बालक हे आर्थिक विवेचने पायी त्यांना बालमजुरी करावी लागते. बालकामगार हे दोन प्रकारे विभाजीत केले जावू शकतात. एक म्हणजे संविधनाच्या दृष्टीकोनातून आणि दुसरे म्हणजे असंविधानीक दृष्ट्या. संविधानिक दृष्ट्या बालकामगार म्हणजे ज्या बालकाचे वय हे वय कमी आहे अशा बालकांना बालकामगार असे म्हणतात. कारखाना अधिनियम १९४८ नुसार १२ ते १५ वर्षापर्यंतच्या बालकांना बालकामगार म्हणून संबोधण्यात येते. भारतामध्ये बालकामगार ही समस्या अनेक वर्षापासून चालत आलेली समस्या आहे. तसेच बालकामगारी ही भारतापुरती मर्यादीत समस्या नसून ती विश्वव्यापी समस्या आहे. बालकामगार हा असा महाभयंकर रोग आहे ज्यांना सर्व जगाला विळख्यात घेतलेले आहे. युनिसेफ यांच्या एका सर्वेक्षणातमध्ये असे निदर्शनात आले आहे की ज्या देशांमध्ये औद्योगिकरणाचे प्रमाण हे जास्त आहे त्या देशांमध्ये बालकामगाराचे सुध्दा प्रमाण हे अधिकच

आहे. उदा. इंग्लंड या देशामध्ये १५ ते २६ टक्के बालक हे ११ वर्ष वयाचे आहेत आणि ३६ ते ६६ टक्के बालक हे १५ वर्ष वयाचे बालकामगार म्हणून काम करत आहेत. अमेरीकेसारख्या प्रगत देशामध्ये सुध्दा बालकामगार ही समस्या आहे आणि या देशातील बालकामगार हे शेतीक्षेत्रामध्ये काम करत असून तेथिल बालमजुरी कायद्याचे उल्लंघन करताना दिसून येत आहे.

**बालकामगारांच्या समस्या :**

भारतामध्ये बालकामगारांचा वापर हा अनेक वित्तीय क्षेत्रांमध्ये केला जात असतो. बालकामगरांच्या अनेक समस्या आहेत त्यापैकी प्रमख समस्या या खालील प्रमाणे आहेत.

**१. आरोग्य विषयक समस्या :**

भारतामध्ये अनेक उद्योग आणि व्यवसायामध्ये बालकामगार हे काम करत आहेत परंतु त्याच्या पैकी असे अनेक उद्योग आणि व्यवसाय आहेत ज्या ठिकाणी बालकामगारांना कामावर ठेवणे कायद्यानुसार निषीध आहे तरी कायद्याचे उल्लंघन करून अनेक कारखाना मालक आणि व्यापरी हे बालकामगारांना कामावर ठेवत असतात. जसे फटाके बनविण्याचे काम, खादानीमध्ये दगड फोडण्याचे काम, किंवा कारखाण्यामध्ये जोखिमीचे काम अशा ठीकाणी कारखाण्यातील यन्त्राचा आवाज हा जास्त असल्यामुळे त्यांना श्रवण क्षमतेशी संबंधीत आजार होत आहेत तसेच फटाक्याच्या कारखाण्यामध्ये काम केल्यामुळे श्वसनाचे अजार होत आहेत.

**२. गरीबी :**

बालकामगारांची सर्वात मोठी समस्या म्हणजे गरीबी ही होय कारण बालकामगार प्रथेचा जन्मच हा गरीबी मधून झाला आहे. असे म्हणले तर वावगे होणार नाही. बालकामगार हा ज्या कुटुंबात वास्तव्य करत असतो त्या कुटुंबाची परीस्थीती ही अत्यंत हालाकीची असते आणि त्यांना गरीबीमुळे आपला उदर्निवाह करणे सुध्दा अवघड जात असते तेव्हा अशा कुटुंबाती पालक हे आपल्या बालकांना बालकामगार म्हणून कामावर जाण्याव भाग पाडत असतात.

**३. निरक्षरता :**

बालकामगारांची आणखी एक समस्या म्हणजे निरक्षरता ही होय. कारण ज्या बालकाचे आई आणि वडील हे निरक्षर असतात आणि त्यांना शिक्षणाबदलची आस्था नसते यामुळे ते आपल्या पाल्यांना बालवयात शाळेमध्ये पाठविण्यापेक्षा कामावर पाठविणे योग्य समजत असतात. या कारणामुळेसुध्दा बालकामगारांच्या संख्ये वाढ होत आहे.

**४. ग्रामिण भागातील बेरोजगारी :**

बालकामगारांच्या संख्येत वाढ होण्याचे आणखी एक कारण म्हणजे ग्रामीण भागातील बेरोजगारी हे होय कारण अनेक गावांमध्ये तेथिल लोकांना काम मिळत नाही. त्यामुळे ते लोक हे गावाकडून शहरामध्ये कामाच्या शोधात येतात आणि शहरामध्ये मिळेल ते काम करण्यास ते तयार असतात. जेव्हा ते शहरामध्ये काम करण्यास सुरूवात करतात तेव्हा शहरी भागातील महागाईमुळे त्यांना आपल्या परीवाराचा उदर्निवाह करणे अवघड होऊन बसते आणि म्हणून ते आपली पत्नी आणि मुलांना कामावर घेवून जातात आणि यातुनच बालकामगाराच्या संख्येत वाढ होत असते.

**५. शारीरीक आणि मानसिक वाढ खुंटते :**

बालकामगार अतिशय कमी वयामध्ये काम करण्यास सुरूवात करतात यामुळे जेव्हा ते एखादे काम करतात त्यावेळेस त्यांना खूप थकवा येतो याचे कारण म्हणजे शारीरीक दुर्बलता होय आणि यामुळे बालकामगारांची शारीरीक आणि मानसिक वाढ खुंटते.

## ६. आर्थिक शोषण :

बलकामगारांना समोरील आणखी एक समस्यां म्हणजे आर्थिक शोषणाची समस्या होय. कारण बालकामगार यांचे वय हे कमी असते आणि त्यांना कामावर ठेवणारे मालक हे त्यांच्याकडून अतिशय जोखिमीचे काम करून घेत असतात आणि त्यांना मजुरी ही खूप कमी देत असतात यामुळे बालकामगारांचे आर्थिक शोषण होत असते.

## ७. अन्याय आणि अत्याचाराचा सामन करावा लागतो :

बालकामगार हे एखाद्या ठेकेदाराकडे किंवा मालकाकडे काम करत असतील तेव्हा त्यांना अनेक प्रकारच्या अन्याय आणि अत्याचाराचा सामना करावा लागत असतो अनेक वेळेस तर त्यांचे मालक हे त्यांना लाकडाच्या काठीने मारहाणसुध्दा करत असतात.

## ८. लैगिंक अत्याचार :

बालकामगारांची सर्वात मोठी आणि महाभयंकर समस्या म्हणजे लैगिंक अत्याचाराची समस्या होय. कारण जेव्हा बालकामगार हे एखादया ठिकाणी काम करत असेल तेव्हा अनेक वेळेस त्यांच्यावर लैगिंक अत्याचाराच्या घटना घडत असतात. ह्या घटना या महिला बालकामगारा सोबत जास्त प्रमाणात घडत असतात.

## संशोधनाचे उद्देश :

१. बालकामगाराच्या सामाजिक व आर्थिक समस्याचे अध्ययन करणे.
२. बालकामगारांच्या पालकांच्या समस्यांचे अध्ययन करणे.
३. बालकामगार विषयक शासकीय योजनाचे अध्ययन करणे.

## नमुना निवड :

सदर संशोधनासाठी नांदेड शहर हे संशोधनाचे कार्यक्षेत्र आहे. हे संशोधन करत असताना नांदेड शहरातील उद्योग क्षेत्रामध्ये तसेच हॉटेल्स आणि अन्य क्षेत्रामध्ये काम करत असलेल्या एकुण कामगारांपैकी १४० कामगारांची निवड हे नमुना म्हणून करण्यात आलेली आहे. तसेच नमुना निवडीच्या लॉटरी पध्दतीच्या माध्यमातुन ह्या नमुण्याची निवड करण्यात आलेली आहे. तसेच मुलाखत अनुसुचीच्या माध्यमातुन उतरदात्याकडून माहिती गोळा करण्यात आलेली आहे.

## संशोधनाचे निष्कर्ष :

सदरचे संशोधनातुन खालील काही प्रमुख निष्कर्ष निघालेले आहेत ते खालिल प्रमाणे आहेत.

१. बालकामगार यांच्यावर मालक आणि ठेकेदारांकडून अन्याय आणि आत्याचार होत आहे.
२. बालकामगारांचे माता पिता हे निरक्षर असल्यामुळे त्याला बालकामगार म्हणून कामावर पाठवत आहेत.
३. बालकामगारांचे आर्थिक आणि शारीरीक शोषण होत आहे.

४. बालकामगारांसाठी असलेल्या कायद्याची योग्य अमंलबजावणी होत नाही.
५. बालकामगारांच्या आरोग्यावर वाईट परीणाम होत आहे.
६. बालकामगार हे शिक्षणापासून वंचीत राहील्यामुळे देशाच्या शिक्षण क्षेत्राच्या विकासामध्ये अडथळा निर्माण होत आहे.
७. बालकामगारांच्या शारीरीक आणि मानसिक विकासावर वाईट परीणाम झाल्यामुळे त्याचा शारीरीक आणि मानसीक आजारांचा सामना करावा लागत आहे.
८. बालकामगारां आळा घालण्यासाठीच्या ज्या काही शासनाच्या योजना किंवा तरतुदी आहेत सर्व योजना ह्या एक तर कागदावर आहेत किंवा त्यांची योग्य अंमलबजावणी होत नाही.

**संदर्भ ग्रंथसुची :**

१. भारतातील बालमजुरीचा प्रश्न, बालमजुरी विरोधी अभियान, महाराष्ट्र राज्य मुंबई.
२. बलकामगार समर्थ साहित्य, यशदा पुणे – २००५
३. जोशी अंजली, असंघटीत क्षेत्रातील कामगार, जोशी प्रकाशन, औरंगाबाद.
४. काळादाते सुधा, सामाजिक समस्या , कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद